MHDH070000972023

**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २०/२०२३</u>**

**थावऱ्या नानटा पावरा**
**विरुध्द**
**तहसिलदार, शिरपूर**

## निशाणी १ खालील आदेश

सदरचा अर्ज अर्जदाराने जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम कायद्यातील कलम १३ उपबंध ३ चे तरतूदीनुसार दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, अर्जदाराचे वडील नामे नानटा महादू पावरा यांचा जन्म ०१.०१.१९५२ रोजी मौजे रोहिणी, ता. शिरपूर, जि. धुळे येथे झालेला आहे. परंतु नानटा महादू पावरा यांच्या आई–वडिलांना तसेच नातेवाईकांना कायद्याचे ज्ञान नसल्याने अर्जदाराच्या वडिलांच्या जन्माची नोंद तहसिलदार, शिरपूर (यापुढे सोयीसाठी 'जाबदेणार' असा उल्लेख केला आहे) यांच्या कार्यालयात करावयाची राहून गेली आहे.

३. आता अर्जदार यास शासकीय व निमशासकीय कामासाठी व शैक्षणिक कामासाठी आवश्यकता असल्याने सदर अर्जदाराने त्याच्या वडिलांच्या जन्म दाखल्याची मागणी जाबदेणार यांच्याकडे केली असता त्यांनी अर्जदाराचे वडील नानटा महादू पावरा यांच्या जन्माची नोंद रजिष्टरमध्ये आढळून आली नाही असा दाखला दिला आहे. त्यामुळे अर्जदार याला त्याच्या वडिलांच्या जन्माची नोंद संबंधित कार्यालयाचे अभिलेखात व्हावी असा आदेश होणेबाबत अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४. अर्जदाराने त्याच्या अर्जातील कथनाचे पुष्ठयर्थ स्वतःचे शपथपत्र निशाणी ७ कडे सादर केले आहे. अर्जदाराने त्याच्या शपथपत्रात अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. सदर शपथपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, नानटा महादू पावरा यांचा जन्म दिनांक ०१.०१.१९५२ रोजी मौजे रोहिणी, ता. शिरपूर, जि.

धुळे येथे झाला आहे. सदर कथनाच्या पुष्ठयर्थ अर्जदाराने वडील नानटा महादू पावरा यांच्या आधारकार्डाची साक्षांकीत प्रत दाखल केली आहे. त्यावरुन नानटा महादू पावरा यांचा जन्म दिनांक ०१.०१.१९५२ रोजी झाल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे तहसिलदार, शिरपूर यांनी दिलेल्या दाखल्याचे अवलोकन केले असता असे प्रथित होते की अद्याप अर्जदाराच्या वडिलांच्या जन्माची नोंद जाबदेणार यांचे अधिकृत कार्यालयात झालेली नाही. सदर अर्जदाराचा पुरावा हा अबाधित राहिलेला असून तो कोणीही आव्हानीत केलेला नाही.

५. जन्म–मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ उपबंध ३ चे तरतुदीनुसार जन्म अथवा मृत्यूची नोंद ही घटना घडलेपासून जर एका वर्षाच्या आत योग्य त्या अधिकृत कार्यालयात न केलेस अशी नोंद त्यानंतर मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे आदेशवरुनच करता येईल व तशी नोंद ही योग्य ती कायद्यानुरुप विलंबशुल्क आकारुन मगच करता येईल.

६. सदर अर्जाच्या अनुषंगाने 'दैनिक वार्ता' या वर्तमान पत्रात दिनांक १६.०१.२०२३ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार अर्जदाराच्या वडिलांच्या जन्माचे नोंदीस कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसांचे आत न्यायालयात दाखल करणे क्रमप्राप्त होते. परंतु आजमितीला तशी कोणतीही हरकत वा तक्रार या न्यायालयात दाखल झालेली नाही.

७. उपरोक्त पुराव्याचा तसेच दाखल कागदपत्रांचा विचार करता असे दिसते की, अर्जदाराच्या वडिलांचा जन्म दिनांक ०१.०१.१९५२ रोजी मौजे रोहिणी, ता. शिरपूर, जि. धुळे येथे झालेला आहे. सदर जन्माबाबत व जन्म तारखेबाबत कोणताही वाद या न्यायालयासमोर उपस्थित झालेला नाही. सदर जन्माची नोंदणी करणेस जन्म झाल्यापासून एक वर्षापेक्षा जास्त कालावधी इतका उशीर झालेला आहे. सदर झालेला

उशीर योग्य तो शुल्क आकारुन माफ करता येईल. अर्जदाराच्या वडिलांचा जन्म या न्यायालयाचे कार्यक्षेत्रात झालेला असल्याने या न्यायालयास योग्य तो आदेश पारित करणेचा पूर्ण अधिकार आहे. अर्जात नमूद केलेल्या कारणांचा विचार करता जाबदेणार यांना सदर अर्जदाराच्या वडिलांच्या जन्माची नोंद करुन घेणेबाबत आदेश पारित करणे न्यायाच्या दृष्टीने उचित होईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. म.तहसिलदार, शिरपूर यांना याद्वारे आदेशित करण्यात येते की, अर्जदार थावऱ्या नानटा पावरा यांचे वडील नामे नानटा महादू पावरा यांचा जन्म दिनांक ०१.०१.१९५२ रोजी मौजे रोहिणी, ता. शिरपूर, जि. धुळे येथे झाला अशी नोंद त्यांचे कार्यालयीन अभिलेखात योग्य तो योग्य तो शुल्क आकारणी करुन करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PANKAJ PRABHAKAR JOSHI
Date: 2023.03.20 13:58:24 +0530

शिरपूर.
दिनांक – १७.०३.२०२३

**( पंकज प्र. जोशी )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (कोर्ट नं.२),
शिरपूर, जि. धुळे.

## CERTIFICATE

I certify that the contents of this P.D.F. file are word to word as per Original order.

Name of the Stenographer : M. M. More
Name of the Court : Court of Jt.C.J.J.D. and J.M.F.C., Shirpur.
P.D.F. Uploading Date : 18.03.2023

Sd/-xxx
Stenographer-III